नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९८ Issue - 98 | वार सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५ Blow- Monday Date 25 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट, इंटेलिजंट करणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रायोगिक तत्वावर देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट सातनवरी गावाचा शुभारंभ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर, दि. २४ : आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे रोल मॉडेल उभे राहिले असून लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. याद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत २४ कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन व नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, सातनवरी गावाच्या सरपंच वैशाली चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून गावात सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातनवरी गावात सुरू झालेला देशातील स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ हे एक क्रांतीकारक पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. गावांना सक्षम करण्याच्या दिशेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील गावागावांमध्ये भारतनेट प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी राज्यात झाली व दुसऱ्या टप्प्याची सुरूवातही झाली. याच धर्तीवर महाराष्ट्रात महानेट हा प्रकल्प राबविण्यात आला. आता याच प्रवासात भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत गावांमध्ये आरोग्य, शिक्षणासोबतच स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी अशा एकूण १८ सेवा कमी वेळात उपलब्ध करून देत सातनवरी हे देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव ठरले आहे.

या गावातील शेतकरी ड्रोन व सेंसर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींचे योग्य नियोजन करून शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवू शकतील. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधरेल. टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होऊन गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार आहे. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होऊन वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल व सातनवरी गाव लवकरच देशात एक रोल मॉडेल म्हणून नावारूपाला येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. तसेच या सेवांचा योग्य प्रकारे वापर करत येत्या वर्षात सातनवरी गावाने देशातील सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकीक मिळावावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सातनवरी गावाने अल्पावधीतच स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनण्याचा बहूमान मिळवला असून लवकरच राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया आदी महत्त्वाचे प्रकल्प देशात राबविले. यालाच पुढे घेऊन जात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात स्मार्ट व इंटेलिजंट गाव तयार करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला व नागपूर जिल्ह्याला हा मान मिळाला, ही अभिमानाची बाब आहे. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने नागपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजनमधून १२०० कोटींचा भरीव निधी मंजूर केला व यामाध्यमातून जिल्ह्यात विविध विकास कामे सुरू असून सातनवरी गावाच्या माध्यमातून देशात विकसित ग्रामीण भागासाठी डिजिटल गावाची सुरूवात झाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर यांनीही उपस्थितांना संबोधित केले. मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी प्रास्ताविक केले तर दिनेश मासोदकर यांनी सुत्रसंचलन केले.

तत्पूर्वी व्हाईस कंपनीचे प्रमुख राकेश कुमार भटनागर यांनी ग्राम पंचायत कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर स्मार्ट व इंटेलिजंट गाव उपक्रमांतर्गत सातनवरी गावात उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या विविध सोई सुविधांबाबत माहिती देत सादरीकरण केले. जिल्हा परिषद नागपूरच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या ४० अंगणवाड्यांचे ई-भूमिपूजन व १५ व्या वित्त आयोगातून प्राथमिक आरोग्य वर्धनी उपकेंद्रात बसविलेल्या सौर पॅनलचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्र्यांचे हस्ते यावेळी करण्यात आले. व्हॉईस कंपनी सोबत स्मार्ट व इंटेलिजंट सातनवरी गाव घडविण्यात सहभागी कंपन्यांच्या प्रतिनिधींना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

योग्य वेळ आल्यावर शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार : अजित पवार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : आम्ही कधीच कर्जमाफीच्या घोषणपासून बाजूला गेलो नाही, आमच्या महायुतीच्या जाहीरनाम्यामध्ये कर्जमाफीच सांगितलं होतं, त्याबाबत आम्ही ठाम असल्याचे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. एखादा निर्णय कर्जमाफीचा बाबत घ्यायचा असेल तर त्याची अंमलबजावणी करत असताना आर्थिक सगळ्या बाबी तपासाव्या लागणार आहेत. यासाठी आम्ही एक कमिटी नेमलेली आहे असे अजित पवार म्हणाले. ते साताऱ्यात बोलत होते.

शेतकऱ्यांना आम्ही कर्जमाफी देणार नाही असं कधीच म्हणलेलो नाही. योग्य वेळ आल्यावर नेमलेली कमिटी त्यासंदर्भातील माहिती देईल यानंतर योग्य वेळ आल्यावर आम्ही कर्जमाफी करणार आहोत असे मतअजित पवार यांनी व्यक्त केले.

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना फोन करून गणपती दर्शनाचं निमंत्रण दिलं आहे याबाबत अजित पवारांनी मिश्किल उत्तर दिले. एका भावाने एका भावाला फोन करून गणपतीला बोलावलं मी कसं बघतो मी तसं बघतो. एक भाऊ दुसऱ्या भावाच्या घरी गणेशोत्सवाला जाणार आहे काय बघतो कसं बघतो असं बघतो की कसं बघतो असे मिश्किल उत्तर अजित पवार यांनी दिलं आहे. पेटा या संस्थेने केलेल्या कबुतरांच्या समर्थनार्थ केलेल्या जाहिरात बाजीबाबत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोण काय म्हणतं यापेक्षा कायद्याने संविधानाने सर्वोच्च न्यायालय हे अंतिम आहे. जर आपलं काही वेगळं मत असेल तर ते न्यायालयासमोर मांडावं. सर्वोच्च न्यायालय त्याबाबतचा निर्णय देईल. मात्र सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबतचा

निर्णय दिलेला आहे आणि त्या पद्धतीने अंमलबजावणी करणं हे सरकारचं काम आहे. चांद्यापासून बांध्यापर्यंत आपला पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करुयात असे अजित पवार म्हणाले. २७ तारखेला गणरायांच आपल्याला स्वागत करायचं आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यावर या जिल्ह्याने प्रेम केले आहे. आदरणीय पवार साहेबांना मनापासून साथ या जिल्ह्यानं दिली आहे. आपण आपल्या लोकांना ख सारखं नवीन तंत्रज्ञान सांगितलं पाहिजे असे अजित पवार म्हणआले. उगीच एकमेकांची उणी धुनी काढत बसण्यापेक्षा अशा क्षेत्रात लक्ष दिलं पाहिजे. साहेब जरी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असले तरी चेअरमन चंद्रकांत दळवी यांना केले आहे. यात ४ लाख मुलं शिक्षण घेत असल्याचे अजित पवार म्हणाले.

दिन का भूक शाम की घर आये तो उसे भूल नही कहते अनिल देसाई पुन्हा घरी आलेत असे अजित पवार म्हणाले. निवडणूक डिसेंबरपर्यंत होण्याची दाट शक्यता आहे. प्रत्येकाने पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे अजित पवार महणाले. कोणत्याही परिस्थितीत एकट वाटून देऊ नका, पक्ष तुमच्या सोबत आहे. निवडणुकीत अपयश आल्यावर आता विरोधक रडीचा डाव खेळत आहेत. माणवासीयांच स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे अजित पवार म्हणाले.

भारतात, रक्ताचा एक थेंबही न सांडता सत्ता बदलत आहे, आपली लोकशाही मजबूत केली : गृहमंत्री अमित शाह

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : अनेक देशांमध्ये परिवर्तनासाठी रक्त सांडले गेले, युद्धे झाली आणि बंड झाले. रक्त सांडले गेले. परंतु भारत हा एकमेव देश आहे जिथे स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरही संवैधानिक पद्धतीने आणि रक्ताचा एक थेंबही न सांडता सत्ता बदलली गेली आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. आज (२४ ऑगस्ट) दिल्ली विधानसभेत अखिल भारतीय सभापती परिषदेचे उद्घाटन गृहमंत्री अमित शाह यांनी केले. ही परिषद दोन दिवस चालेल. २९ राज्यांच्या विधानसभांचे सभापती आणि सहा राज्यांच्या विधानपरिषदांचे अध्यक्ष आणि उपसभापती यात सहभागी झाले आहेत. याशिवाय राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, माजी लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार आणि अनेक केंद्रीय कॅबिनेट मंत्री देखील या परिषदेत सहभागी होतील. दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंदर गुप्ता म्हणाले की, २४ ऑगस्ट १९२५ रोजी विठ्ठलभाई पटेल यांची केंद्रीय सभेचे पहिले भारतीय सभापती म्हणून निवड झाली. या परिषदेला १०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ही परिषद आयोजित केली जात आहे.

आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा चर्चा व्हायच्या. लोक देश कसा चालवायचा याची खिल्ली उडवत असत. पण आज मी या ऐतिहासिक सभागृहात अभिमानाने सांगत आहे की, ८० वर्षांत आपण तळापासून खालपर्यंत लोकशाहीचा पाया रचण्याचे काम केले आहे. आणि आपण हे सिद्ध केले आहे की लोकशाही भारतीय लोकांच्या प्रत्येक नसांमध्ये आहे, भारतीय लोकांच्या स्वभावात आहे. कारण, आपण असे अनेक देश पाहिले आहेत जे लोकशाही पद्धतीने सुरू झाले. परंतु एका दशकानंतर, दोन दशकांनंतर, तीन दशकांनंतर, चार दशकांनंतर, लोकशाहीऐवजी वेगवेगळ्या प्रकारची कामे होऊ लागली. आपल्या राजकीय हितासाठी संसदेत वादविवाद होऊ न देणे चुकीचे आहे. आपल्याला संपूर्ण दिवस अधिवेशन चालू न देण्याचा विचार करावा लागेल. जेव्हा जेव्हा विधानसभांनी त्यांची प्रतिष्ठा गमावली आहे, तेव्हा आपल्याला खूप वाईट परिणाम भोगावे लागले आहेत. या प्रसंगी, मी तुम्हाला महाभारतातील हस्तिनापूर विधानसभांचे उदाहरण देऊ इच्छितो. महाभारत तेव्हा घडले जेव्हा विधानसभांमध्ये महिलांचा आदर केला जात नव्हता. देशाच्या हितासाठी लोकांचा आवाज बनण्यासाठी विधानसभांचे प्रतिष्ठान हे एक माध्यम असले पाहिजे.

म्हणूनच येथे सभापतींना एका संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे. सभापती ही स्वतः एक संस्था आहे. सभापती एका राजकीय पक्षातून निवडला जातो. तो एक राजकीय विचारसरणी घेऊन येतो. पण सभापतीपदाची शपथ घेताच त्याला पंच म्हणून काम करावे लागते. म्हणूनच, संपूर्ण विधानसभेत जर कोणाची भूमिका सर्वात कठीण असेल तर ती सभापतींची आहे. आज मी अभिमानाने सांगू शकतो की भारतीय स्वातंत्र्याच्या या ८० वर्षात आणि आपल्या संविधानाच्या ७५ वर्षात, आपल्या देशातील विधानसभा, विधानसभा आणि लोकसभेतील सभापतींनी नेहमीच भारताचा अभिमान वाढवण्याचे काम केले आहे.

तुमच्याच माणसाने व्हिडिओ काढला, नोटीस बिचाऱ्या रोहितला पाठवली, सुप्रिया सुळेंचा कोकाटेंना टोला

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मागे बसलेल्यांनी व्हिडिओ काढला पण नोटीस बिचार्या रोहितला पाठवली असे म्हणत खासदार सुप्रिया सुळे यांनी कोकाटेंवर टीका केली. कॉपी करतो त्यालाच तुम्ही पेपर तपासायला बोलवता असा टोला देखील सुप्रिया सुळे माणिकराव कोकाटे यांना लगावला. सरकारने हद्द केली म्हणत सुप्रिया सुळेंची राज्य सरकारवरही टीका.

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माणिकराव कोकाटे यांच्या रमी गेम खेळण्यावरुन राज्य सरकारवर टीका केली आहे. इंदापूरमधील एका कार्यक्रमादरम्यान सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर माणिकराव कोकाटे प्रकरणावरुन जोरदार हल्लाबोल केला आहे. जो माणूस विधिमंडळामध्ये मोबाईलवर गेम खेळत होता, एकतर तो पकडला गेला त्याला आम्ही जबाबदार नाही. तुम्ही बसला होता त्याच्या पाठीमागच्याच माणसाने व्हिडिओ काढला याचा अर्थ व्हिडिओ तुमच्याच विचाराच्या माणसाने काढलाय. समोरच्या लोकांनी तर व्हिडिओ काढला नाही पण बिचार्या रोहितला अब्रू नुकसानीची नोटीस पाठवली आहे. अहो व्हिडिओ आम्ही नाही काढला मागे बसणाऱ्याने काढलाय, त्यात आमचा काय संबंध? आम्ही फक्त ट्विटरवर टाकला असं सुळे म्हणाल्या.

गंमत अशी झाली की दत्तात्रय भरणे यांना शेती खात गेलं आणि कोकाटे यांना क्रीडा खाते मिळालं. पण आता खेळ करताना आम्ही केंद्रामध्ये कायदा पास केला. ज्या गेमवर पैसे लावले जातात ते ऑनलाईन सर्व खेळ या देशात बंद केले आहेत. केंद्र ज्यावेळेस कायदा करते त्यावेळी ते प्रत्येक राज्यासाठी करतं राज्य सरकारने त्याचे नियम करावे लागतात मात्र आता महाराष्ट्रात नियम करताना क्रीडा मंत्री कोण? असा प्रश्न उपस्थित करत सुप्रिया सुळे यांनी हाताम ध्ये पत्ते खेळण्याची नक्कल करत या कायद्याचे नियम कोण करणार? असा सवाल केला. मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना उद्या पत्र लिहिणार आहे की ज्या मंत्र्याला तुम्हाला बदलावं लागलं का तर तो कामावर बसलेला असताना मोबाईलवर गेम खेळत होता. आता ऑलाईन गेमवर केंद्र सरकारने बंदी आणली आहे त्या बंदीवर नियम कायदे बनवायला तोच मंत्री तुम्ही बसवलाय. जो मुलगा वर्गात कॉपी करतो त्यालाच तुम्ही पेपर तपासायला बोलवता. आता या सरकारने हद्द केली असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर टीका केली.

मनोज जरांगेंचा बीडमधून एल्गार | **देवेंद्र फडणवीसांना थेट आव्हान**

सत्ता बदलत असते, त्याच्या जीवावर उड्या मारू नका

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बीड : आम्ही शांततेत मुंबईला जाणार आणि शातंतेत मराठा आरक्षण घेणार, मराठा समाजावर आलेले संकट मोडून काढणार असं वक्तव्य मनोज जरांगे यांनी केलं. मराठा समाजाच्या सभेमध्ये डीजे वाजवू दिला नाही, पण यापुढे बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. सत्ता येत असते, ती बदलत असते हे लक्षात ठेवा असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. आता ही शेवटची फाईट आहे, अशी मारायची की आरक्षण घेऊनच यायचं असं मनोज जरांगे म्हणाले.

बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचं ते करा असं थेट आव्हान मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं. सरकारने जर मराठ्यांना आरक्षण दिलं, आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही मुंबईला कशाला येऊ? इथूनच मंत्रालयावर गुलाल उधळतो. गडबड घोटाळा करु नका. त्यामुळे मराठा समाजावर संकट घोंघावतंय. ते संकट आता मोडून काढायचं आहे. तुमच्या आणि माझ्या भावनांचा सत्ताधाऱ्यांनी वापर करुन घेतला. मराठ्यांची ताकद मोठी आहे, पण आपण विचारांनी चाललो नाही. त्यामुळे आपल्या मुलांचं नुकसान झालं. प्रत्येकाने आपला वापर केला. उभ्या पिढ्यांचं वाटोळं झालं. यापुढे आपण विचारांनी चालायचं. बीडमधील मराठा समाज आता

एक झाला आहे, गर्व वाटेल असं काम करतोय. आज बीडची गर्दी पाहून सत्ताधारी बेजार झालेत. आता असंच मुंबईला जायचं. बीडच्या सभेमध्ये पोलिसांनी डीजे वाजवू दिला नाही. त्यावर मनोज जरांगे म्हणाले की, आपल्याला बीडच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, ठीक आहे. पण आमचा डीजे वाजवू दिला नाही, यापुढे बीडमध्ये कुणाचाही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. देवेंद्र फडणवीसांनी जर पोलिसांना आदेश दिले असतील आणि पोलीस जर चुकीचे काम करत असतील तर तसं करू नका. एवढी विनंती करुनही जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला काही करायचं असेल तर त्या महादेव मुंडेच्या मारेकऱ्यांना शोधा.

मनोज जरांगे म्हणाले की, तुमच्या जातीचा आमदार, खासदार आहे म्हणून तुमच्या पोराबाळांची फी माफ होणार नाही, त्याला नोकरी मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने मुंबईला यावं. कुणा राजकीय नेत्याचं ऐकून गावात थांबू नका. तुमच्या आमदार, खासदारांना मुंबईला यायला सांगा. सरपंचापासून सगळ्या नेत्यांना मुंबईला यायला सांगा. आता ही शेवटची लढाई असेल.

संपादकीय....

भारताचे अधिराज्य

जगभरातील देशांमध्ये भारतीय उत्पादने पोहोचवण्यासाठी सरकार एक नवीन योजना आखत आहे. अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या निर्यात प्रोत्साहन मोहिमेअंतर्गत केंद्र सरकार २०२५ ते २०३१ पर्यंत निर्यातदारांना सुमारे २५००० कोटी रुपयांची मदत देण्याची योजना विचारात घेत आहे. या योजनेनुसार, वेगवेगळ्या कामांसाठी वेगवेगळ्या रकमा खर्च केल्या जाणार आहेत. या मोहिमेचे उद्दिष्ट पुढील ६ वर्षांत मोठ्या प्रमाणात, समावेशक आणि शाश्वत निर्यात वाढीला चालना देणे आहे. या मदतीचा मुख्य उद्देश निर्यातदारांना स्वस्त आणि सुलभ कर्जे देणे आहे. वाणिज्य मंत्रालयाने हा प्रस्ताव अर्थ मंत्रालयाच्या खर्च वित्त समिती कडे पाठवला आहे. जर तो मंजूर झाला तर तो भारतीय निर्यातदारांना विशेषतः अमेरिकेच्या करांमुळे निर्माण झालेल्या जागतिक व्यापाराच्या अनिश्चिततेपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करेल. ईएफसीकडून मंजुरी मिळाल्यानंतर, वाणिज्य मंत्रालय केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मंजुरी घेईल. या मोहिमेचे उद्दिष्ट पुढील ६ वर्षांत (आर्थिक वर्ष २०२५-२०३१) मोठ्या प्रमाणात, समावेशक आणि शाश्वत निर्यात वाढीला चालना देणे आहे. याअंतर्गत, पारंपारिक पद्धतींच्या पलीकडे जाऊन एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) ज्या प्रमुख समस्यांना तोंड देतात त्यावर उपाय शोधले जातील. सूत्रांनी सांगितले की, दोन उप-योजनांद्वारे हे अभियान राबविण्याची योजना आहे. निर्यात प्रोत्साहन योजनेअंतर्गत सरकार ज्या गोष्टींचा विचार करत आहे.

माजी मंत्री महादेव जानकर यांनी केली शिंदी येथील पीक पाहणी

राज्य सरकारने फक्त आश्वासन न देता शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी : माजी मंत्री जानकर

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : १५ ऑगस्ट रोजी अतिवृष्टीने शिंदी येथील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, अनेक घरांची पडझड सुद्धा झाली होती, अनेकांच्या घरात पाणी बसून अन्य धान्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

त्यानंतर तहसीलदार अजित दिवटे, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, माजी मंत्री डॉक्टर राजेंद्र शिंगणे, शेतकरी नेते रविकांत तुपकर, यांनी शिंदी येथे जावून नुकसान ग्रस्त भागाची पाहणी केली, शेतकऱ्यांना धीर दिला.

त्यानंतर दिनांक २३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेव जानकर यांनी शिंदी येथे जाऊन नुकसानग्रस्त शेती पिकांची पाहणी केली, व तातडीने शेतकऱ्यांना मदत कशी मिळेल याची काळजी घ्या असे सुद्धा त्यांनी तहसीलदार उपविभागीय अधिकारी जिल्हाधिकारी यांना फोनवरून सांगितले, तसेच राज्य सरकारने फक्त मोठमोठ्या गप्पा केल्या आम्ही कर्जमाफी करू असं करू तसं करू , तसे त्यांनी कुठलेही आश्वासन पाळले नसून, शेतीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून तातडीने शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी सुद्धा माजी मंत्री महादेव जानकर यांनी राज्य शासनाकडे केली आहे, काही ठिकाणी अजूनही पंचनामे झाले नसून त्या ठिकाणचे पंचनामे सुद्धा त्वरित करण्याची मागणी त्यांनी केले, यावेळी माजी मंत्री महादेव जानकर यांच्या समवेत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर तौसिफ शेख, प्रदेश सचिव संजय कन्नावार, प्रदेश सचिव नरेश मंडल, जिल्हाध्यक्ष कारभारी गायकवाड जिल्हा संपर्कप्रमुख अतुल भुसारी, तालुका अध्यक्ष संतोष वनवे, पत्रकार सचिन खंडारे, पंढरी आटोळे, परमेश्वर आटोळे, संतोष खरात, मंगेश बंगाळे नितेश खरात, रमेश खरात, किरण तांबोळी, पंजाबराव मोरे, सुनील खंडारे राहुल खंडारे, रतन खंडारे, साखरखेर्डा ग्रामपंचायत सदस्य देवानंद खंडागळे, हर्षल बंगाळे, यांच्यासह अनेक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयाच्या वरिष्ठ विभागाने घेतले विविध उपक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री तसेच संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

दोन दिवशीय कार्यक्रमामध्ये दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी विविध कलागुणदर्शनपर कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. यामध्ये पोवाडागायन, गीत गायन, कविता वाचन, मिमिक्री, मेहंदी, नृत्य व प्रबोधनपर किर्तन इ. कलाप्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले.

दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी रांगोळी व विविध प्रकारच्या कला व मनोरंजन पर खेळ विद्यार्थ्यांनी सादर केले.

मोठ्या संख्येने विद्यार्थी सदर कला प्रकारात सहभागी झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे,उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा यासाठी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा लामतुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजाराम गावडे यांनी केले. आभार प्रा. सचिन आरडे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी कला शाखाप्रमुख डॉ. भरत भुजबळ, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. शिवाजी वीर, वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. सदाशिव उंबरदंड , डॉ. गजानन ढोबळे, डॉ. मृदुल कांबळे, डॉ. मनीषा गायकवाड, प्रा. प्रकाश करे, प्रा. शिवाजी राजगुरू, प्रा. मुक्ता लाळगे, डॉ. तानाजी कसबे व इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

निफाड नगरपंचायतच्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी :

निफाड नगरपंचायत च्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, पर्यावरण पूरक गणेश मूर्तीचीच स्थापना नागरिकांनी व गणेश मंडळांनी करावी असे निफाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी धीरज भामरे यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

निफाड नगरपंचायत च्या वतीने जि प शाळा क्रमांक एक येथे शाडू माती पासून श्रींची मूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली होती, शाडू मातीच्या मूर्ती या पाण्यात सहज विरघळतात व पर्यावरणाला कुठली हानी पोहोचत नाही, परंतु प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे नदी तलाव व विहिरींचे प्रदूषण वाढते या मूर्ती पाण्यात लवकर विरघळत नाही याचा परिणाम जलचर जीवसृष्टीवर होतो तरी प्रत्येक नागरिकांनी गणेश मंडळांनी प्रदूषण मुक्त गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन मुख्याधिकारी भामरे यांनी केले आहे, यावेळी मूर्तिकार राकेश बोरसे, गणेश कदम यांनी सर्व विद्यार्थ्यांना मूर्ती विषयी प्रशिक्षण दिले. याप्रसंगी शरद काकुळते, अनिल गंधम वाड, विनोद त्रिभुवन, प्रवीण पठाडे, सुनील गांगुर्डे, सिंधुताई जगताप, सिद्धार्थ जगताप, मनोज ठाकूर, या आकाश निशांत तसेच जि प शाळेचे शिक्षक शिक्षिका विद्यार्थी उपस्थित होते.

नागेश फाटे यांचा राजकीय कृतज्ञता पुरस्काराने सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर /प्रतिनिधी : पुरोगामी विचाराचे दैनिक एकमत सोलापूर आवृत्तीच्या ३४ व्या वर्धापन दिन सोहळा शनिवारी सोलापूर येथील आबासाहेब किल्लेदार सांस्कृतिक भवन येथे मोठ्या दिमाखात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना कृतज्ञता सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.

लोकसेवेच्या भावनेतून राजकारणात यशस्वी वाटचाल करणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष, उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांचा मान्यवरांच्या हस्ते राजकीय कृतज्ञता पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, ज्येष्ठ नेते माजी आमदार धनाजी साठे, संपादक मंगेश डोंगरजकर, चेतन नरोटे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, डॉ. वैजिनाथ कुंभार, मीनल साठे, शोभा मोरे, डॉ. श्रद्धा जवंजाळ, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, अल्ताफ शेख, सयाजी झुंजार, विक्रम खेलबुडे, सोलापूर आवृत्तीप्रमुख संजय येऊलकर, पंढरपूर तालुका प्रतिनिधी अपराजित सर्वगोड उपस्थित होते.

शिक्षणातून प्रगतीकडे वाटचाल करून सुजाण नागरिक बनवून देशसेवा करण्याची आवड निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांना कायम प्रोत्साहन देऊन परीक्षेत यश संपादन केलेल्या नूतन अधिकाऱ्यांना सन्मानित करून त्यांचा आदर्श इतरांनी घ्यावा. यासाठी प्रयत्न करणारे नागेश फाटे हे लोकसेवेच्या भावनेतून ४० वर्ष राजकारणात सक्रिय आहेत.

सर्वसामान्य लोकांचे प्रश्न, समस्या राजकारणाच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांसमोर मांडून लोकांसाठी आपल्याला काहीतरी करायचे आहे. ही लोकसेवेची भावना मनात ठेवून नागेश फाटे यांनी राजकारणात कामाला सुरुवात केली होती. माजी आमदार स्व. औदुंबरअण्णा पाटील, स्व. वसंतराव काळे, स्व. आमदार भारतनाना भालके यांच्याकडून तालुक्याच्या राजकारणात फाटे यांना मोलाचे मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली.

सुरुवातीला गादेगाव ग्रामपंचायतीमध्ये उपसरपंचपदाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पडली.

यादरम्यान काँग्रेस सेवा दलाचे तालुकाध्यक्ष, राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीसपद तसेच काँग्रेस सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष म्हणून देखील जबाबदारी त्यांनी सांभाळली. सुरुवातीपासूनच त्यांना सहकार शिरोमणी स्वर्गीय वसंतराव काळे यांचे सहकार्य लाभले. सध्या नागेश फाटे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष, उद्योग व व्यापारी विभागाचे प्रदेशाध्यक्ष तसेच सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखान्याचे संचालक म्हणून काम पाहत आहेत.

दुधनी जन्मभूमी फाउंडेशनचे कार्य दुधनीकरांच्या हिताच्या व मी फाऊंडेशनला अहोरात्र सहकार्य करेन : मालोजीराजे भोसले

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : दि.२२:जन्मभूमी फाऊंडेशनचे जो वृक्षारोपणाचे कार्य हाती घेतली ते भविष्यात दुधनी करायसाठी लाभदायक असून त्यास मी अर्धा रात्री मदतीस धावून येतो.असे वक्तव्य अक्कलकोट नगरीचे युवा राजे (तीसरे) श्री.मालोजीराजे भोसले यांनी व्यक्त केली आहे. स्वातंत्र्याच्या ८९ व्या अमृतम होत्सव वर्षाच्या औचित्य साधून दुधनीतील तरुण शिवा लक्ष्मिपुत्र झळकी यांनी पुढाकार घेऊन संपूर्ण दुधनी गावात स्वखर्चाने वृक्षारोपण करण्याचे धाडस केली आहे.

दुधनी येथील श्री शांतलिंगेश्वर विरक्त मठाच्या प्रांगणात ही कार्यक्रमाचे आयोजन जन्मभूमी फाऊंडेशनच्या वतिंने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मठाधिपती श्री शांतलिंगेश्वर महा स्वामीजी हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दुधनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री लक्ष्मीकांत कहार,कृ.उ.बा.समितीचे सभापती अप्पु परमशेट्टी, माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, रिपब्लिकन पक्ष(आठवले) सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष श्री.सैदप्पा झळकी, मा.नगरसेवक महेश पाटील,प्रा. बिराजदार, प्रा.वाग्दरी सर,विजय मानकर, गोरखनाथ धोडमनीसह गावातील प्रतिष्ठीत व्यापारी, नौकर वर्ग व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

पर्यावरणाची संतुलन ठेवणे व गावाच्या शोभा वाढवणे हे जन्मभूमी फाउंडेशन दुधनी यांच्या मुख्य हेतु आहे.

शुक्रवार,१५ ऑगस्ट २०२५ रोजी दुधनी येथे एका भव्य वृक्षारोपण समारंभाचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते.या ऐतिहासिक सोहळ्याला दुधनीकरांसहित मान्यवर,पर्यावरणप्रेमी नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.निसर्गाचे संतुलन राखणे आणि हरित पर्यावरणाची निर्मिती करणे' या उदात्त हेतूने दुधनीच्या आवश्यक तेथे विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली.संस्थेचा हा उपक्रम स्थानिक पर्यावरणासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

जन्मभूमी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शिवा लक्ष्मीपुत्र झळकी, उपाध्यक्ष मिहीदीमियाँ मदार जिडगे, सचिव लक्ष्मीपुत्र गोटे, सहसचिव श्रीशेल चिंचोळे आणि खजिनदार महेश गायकवाड, सदस्य यशवंत गुंडप्पा व्हंदे, लक्ष्मीपुत्र शिवलिंगप्पा झळकी,चन्नू हावशेट्टी, चंद्रकांत वागदर्गी सर, विशाल निंबाळे, जगदीश पारे, यश बिराजदार, महेश पारेश्री गुरुशांत लिंगेश्वर जुनियर कॉलेजचे प्राध्यापक सुशांत गद्दी सर,तसेच बसवराज बंद्राड सर, सचिन झळकी, शिवा हौदे, संजय अमाणे यांच्या नियुक्ती केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशाल येगदी, अपेक्स कम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संस्थापक चंद्रकांत वागदरी सर, श्रीराम संघटना, शांभवी फाउंडेशन, बसव प्रतिष्ठान, बैलगाडी संघटना, व दुधनीतील मुस्लिम समाज, लिंगायत समाज, बौध्द समाज, बंजारा समाज, हरळया समाज, ढोर समाज, वडार समाज आणि इतर सर्व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती व संघटनांनी देखील या कार्यात सक्रिय सहभाग घेतला होता.

यावेळी एस.जी.परमशेट्टी हायस्कूल व मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे प्रशाला येथील इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस वितरण व दुधनी आरोग्य केंद्राचे डॉक्टर आणि म्बुलन्स ड्रायव्हर, तसेच दुधनी नगरपालिकेचे कर्मचारी आणि सफाई कर्मचारी यांच्या निस्वार्थ सेवेचा गौरव प्रित्यर्थ सत्कार करण्यात आला.

शहापूर आसनगावला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ३ च्या पुला खाली रस्त्यावर खड्डेच खड्डे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

शहापूर प्रतिनिधी/दिनेश घनघाव : शहापूर तालुक्यातील शहापूर ते आसनगाव रेल्वे स्टेशनला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ३ च्या पुला खाली मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. सततच्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे. पाऊसच साचलेलं पाणी, खड्डे चुकवण्यासाठी थांबलेल्या वहानानमुळे होणारी रहदारी या कारणाने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तर या खड्ड्यांना कायमस्वरूपी बूजविण्याची तसदी संबंधित विभाग घेत नसून नागरिकांकडून संतापची लाट उसळली आहे. या खड्ड्यांमध्ये वाहने आदळत असल्यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होत आहे तर चालकांना, विद्यार्थ्यांना, रुग्णांना तारेवरची कसरत करावी लागत आहे, लवकरच गणेश उत्सव सुरु होत आहे तरी प्रशासनान ह्या कडे लक्ष देऊन हे खड्डे बुजवतील का..? हा प्रश्न नागरिकांना पडत आहे.

खड्ड्यांमुळे नागरिक, वाहनचालक, कॉलेज विद्यार्थी त्रस्त

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

सिन्नूर गावाच्या जातीवादी क्लार्क कडून मागासवर्गीय सरपंच यांना अपमानास्पद वागणूक

सिन्नूर ग्रामपंचायतमधील क्लार्क जेवरगीचे सरपंच कल्पना सोनकांबळे यांची चौकशीची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील सिन्नूर ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवक कार्यालयात उपस्थित नसताना मागील ग्रामसेवक व क्लार्क यांनी संगनमताने आठ नंबर रजिस्टर मध्ये उतारे नोंद केले असून याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी सिन्नूर गावच्या सरपंच श्रीमती कल्पना सोनकांबळे यांनी अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात मागील ग्रामसेवक सादिक वळसंगकर व क्लार्क शिवपुत्र जेवरगी यांनी अधिकार नसताना आठ नंबर रजिस्टर मध्ये अनेक जागेच्या नोंदी केल्या आहेत .जागेच्या नोंदी करण्यासाठी ग्रामस्थांकडून पैसे घेण्यात आले. स्वतः सरपंच श्रीमती कल्पना सोनकांबळे या कार्यालयात उपस्थित असताना दिनांक १४ ऑगस्ट रोजी मागील ग्रामसेवक सादिक वळसंगकर यांनी मनमानी करत आठ नंबर रजिस्टर मध्ये नावे नोंद केले असे निवेदन सरपंच श्रीमती कल्पना सोनकांबळे यांनी अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शंकर कवितके यांना दिले आहेत. गावातील सेवाकाळ समाप्त झालेले मागील ग्रामसेवक व क्लार्क यांना ग्रामपंचायत मध्ये मनमानी कारभार करण्याचा अधिकार कोणी दिला असा सवाल

सरपंच श्रीमती कल्पना सोनकांबळे यांनी केला आहे. मागासवर्गीय महिला सरपंच असल्याने जातीवादी क्लार्क हे मनमानी करून बेकायदेशीर कामे करत आहे त्याबाबत विचारल्यावर क्लार्क जाती वाचक अपमानस्पद बोलून चार चौघात अपमान करीत आहे कुठले ग्रामपंचायत कागदपत्रे रजिस्टर, दप्तर दाखव नाही सरपंचांना अधिकाराचे व कार्य कर्तव्याचे अधिकारापासून वंचित ठेवत आहे काही प्रश्न विचारले तर तुमचं संबंध नाही मी फक्त ग्रामसेवक यांचच काम करतो असे अडमुठे धोरण घेत आहे व कोणताही विचार न करता मागील ग्रामसेवक व क्लार्क यांनी माझ्या उपस्थितीमध्ये रजिस्टर मध्ये नावे नोंदवून माझा अपमान केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून या दोघांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी सरपंच श्रीमती कल्पना सोनकांबळे यांनी केला आहे. अन्यथा पंचायत समिती अक्कलकोट कार्यालयासमोर आत्म दहनाचा इशारा सरपंच श्रीमती कल्पना सोनकांबळे यांनी दिला आहे.

मुगळी येथे पशुवैद्यकीय चिकित्सा, लसीकरण मोहिम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुधनी/प्रतिनिधी : पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या १५०० व्या जयंतीचे औचित्य साधून अक्कलकोट तालुका येथील मोजे मुगळी येथे मुस्तफा ईनामदार मित्र परिवार व नवभारत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच दुधनी श्रेणी १ पशुवैद्यकीय दवाखाना येथील पशुवैद्यकीय अधिकारी (श्रेणी १) श्री एस एस चराटे साहेब व सहकारी यांच्या सकारात्मक सहकार्याने १५०० व्या मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या जयंती चे औचित्य साधून मौजे मुगळी येथील पाळीव प्राणी, शेळ्या मेंढ्या, गायी व तत्सम प्राण्यांना रोग प्रतिकारक लसीकरण व लंपी रोगापासून प्रतिकार करण्यासाठी लंपी रोग प्रतिकारक लस व त्याच प्रमाणे इतर औषधोपचार मोहीम घेण्यात आली.

सदर मोहिमेत १०० पेक्षा जास्त जनावरांना लंपी प्रतिबंधक लस, शेकडो पाळीव प्राण्यांना रोग प्रतिकारक लस तसेच शेकडो नवीन जनावरांना टॅग देऊन शासकीय नोंद करण्यात आली.

पशुवैद्यकीय दवाखाना आणि त्यांचे अधिकारी मुक्या जनावरांच्या औषधोपचारासाठी कायम तत्पर आहेत व राहतील, आणि त्याच प्रमाणे पशुवैद्यकीय संदर्भात सर्व शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात कार्यरत राहतील असे आश्वान अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आले.

मोहम्मद पैगंबर साहेब हे साऱ्या जगा साठी शांतीदूत व अल्लाह कडून अख्या विश्वासाठी आशीर्वाद आहेत व जसे त्यांनी माणसांवर प्रेम करण्याचे उपदेश दिले आहेत तसेच मुक्या जनावरांना सुद्धा प्रेम, करुणा देण्याचे उपदेश दिले व त्याचेच आचरण करत ही मोहीम राबविल्याची माहिती मो मुस्तफा ईनामदार यांनी मनोगत व्यक्त करताना दिली. सदर मोहीम यशस्वी करण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी श्री एस एस चराटे, श्री शुक्ला व त्यांचे सहकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सदस्य, कृषी उद्योजक मोहसीन भाई इनामदार, व मुगळी गावातील लाभार्थी शेतकरी यांचा सहभाग मिळाला.

निफाड पोलीस स्टेशनच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : निफाड पोलीस स्टेशन येथे ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी जेष्ठ नागरिकांना आमंत्रित करून त्यांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान केला.

यावेळी पोलीस निरीक्षक गुरव यांनी जेष्ठांचा सन्मान करत कुठल्याही अडीअडचणीच्या काळात आपणास जर त्रास झाला, घरात किंवा बाहेर आपणास कुठल्याही समस्या उद्भवल्यास नक्कीच पोलिसांशी संपर्क साधा आम्ही सदैव आपल्या सोबत आहोत असे आश्वासन दिले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे सुधाकर कापसे संतोष राऊत, सुरेश जाधव, काळे बाबा, अशोक कांदळकर, भास्कर धारराव, सुरेश कायस्थ, वसंत कापसे, भास्कर कापसे, कैलास कुंदे, आधी ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

प्रा. स्वाती कराड-चाटे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वाखरी/ता. पंढरपूर : माईर्स एमआयटी ग्रुपच्या विश्वस्त व महासचिव तसेच एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ आणि विश्वशांती गुरुकुलच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांचा वाढदिवस एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, वाखरी येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त स्कूलमध्ये महामृत्युंजय मंत्राचे पठण विद्यार्थ्यांनी केले तसेच विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या वतीने गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात अन्नधान्य सामुग्री देण्यात आली आणि वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ, हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी यांच्यासह शाळेचे व ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले.

कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण संवर्धन व समाजप्रबोधन या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या भाषणांत प्रा. स्वाती कराड-चाटे यांचे सामाजिक, शैक्षणिक योगदान व प्रेरणादायी कार्य अधोरेखित केले. कार्यक्रमाचा समारोप सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत करण्यात आला.

दु:खावर मात करत तेजस्वीणी वाघमारे यांची पोलीस दलात दमदार इंट्री : येडोळा ग्रामस्थानी केला सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के. गायकवाड : पती निधनाच्या दु:खावर मात करत ११ वर्षीय मुलीचे शिक्षण व पालण पोषण करत जिद्दीने पोलीस दलात भरती होण्याची तयारी करून तुळजापूर तालुक्यातील येडोळ येथील कन्या तेजस्वीनी विशांत वाघमारे - लोंढे यानी पोलीस दलान दमदार प्रवेश मिळवून नुकतच लोणावळा पुणे येथील पोलीस प्रशिक्षण केंदातून पोलीस कॉंस्टेबल पदाचे प्रशिक्षण पूर्ण करून रितसर धाराशिव पोलीद दलात रुजू झाल्या आहेत.ही एक आभिनंदयीन बाबा असून त्यांचा सिध्दार्थ कला व क्रिडा मंडळ आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शाखा येडोळा च्या वतीने येथोचित सात्कार करण्यात आला.

नुकतच सिद्धार्थ कला व क्रिडा मंडळ येडोळा व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शाखा येडोळाच्या संयुक्त विद्यामाने विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील जेष्ठ कार्यकर्ते रमेश लोंढे हे होते तर प्रमुख पाहणे म्हणून भाजपाचे नंदगाव जि.प. गटाचे गट प्रमुख सिद्धू आण्णा कोरे,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी, रिपाइंचे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड, रिपाइंले नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे आदी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून नुतन पो.कॉ.तेजस्वीनी वाघमारे-लोंढे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या तुळजापूर तालुका अध्याक्षपदी निवड झाल्या बद्दल अरुण लेखंडे तर नंदगावचे नुतन सरपंच शशिकांत नागीले आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन अमर जेटीथोर यानी केले.

यावेळी दलित पँथरचे जिल्हा संपर्क प्रमुख शामकांत नागीले, रिपाइंचे जळकोट शाखा अध्यक्ष, आरविंद लोखंडे, डीबीएन चे तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड, रिपाइंचे तालूका संघटक सुरेश लोंढे, अर्जुन लोंढे, रिपाइंचे येडोळा शाखा अध्यक्ष देवानंद लोंढे, उपाध्याक्ष मारुती लोंढे, अमित लोंढे, भानुदास लोंढे, दिलीप भांगे,डॉ. सुरज लोंढे, सुनिता लोंढे, सुवर्णा लोंढे, शितल लोंढे, रेखा लोंढे, रतन लोंढे, स्नेहा लोंढे सह महिला, ग्रामस्थ,युवा कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

भिवंडी तालुका ग्रामीण युवक कार्याध्यक्षपदी सुरज खरे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : सूरज काळूराम खरे यांची गुरुवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या भिवंडी तालुका ग्रामीण युवक कार्याध्यक्षपदी निवड करण्यात करण्यात आली आहे. सदर नियुक्ती ठाणे जिल्हा ग्रामीण युवक अध्यक्ष सुधीर बंडारशेठ पाटील यांच्या हस्ते सुरज खरे यांना नियुक्ती पत्र देवून केली आहे. या निवडीने सूरज खरे यांच्यावर त्यांच्या हितचिंतकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तर या निवडीनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वाढीसाठी आपण सर्वो तोपरी प्रयत्नशील असल्याचा निर्धार खरे यांनी निवडी वेळी व्यक्त केला आहे. तसेच शरद पवार गटाच्या माध्यमातून समाजकारण करणार असल्याची ग्वाही सुद्धा त्यांनी बोलून दाखवली आहे.

फुशाआ स्टडी सर्कलची १२८ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन

कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेचा पदाधिकारी हा बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे प्रांताचे प्रधानमंत्री हा प्रांताच्या बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील विधानावर १२८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १७ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, मुळात हा विषय सभागृहात कार्यरत असलेल्या प्रतिनिधींच्या भत्ते व पगाराविषयी संबंधित होता. करिता वर्तमानातील विविध सभागृहात अस्तित्वात असलेल्या प्रतिनिधींना मिळणारे भत्ते पुरेसे आहेत किंवा नाही? हे तपासले पाहिजे. त्यांना पुरेशा निधी मिळत असल्यास ते भ्रष्टाचार करणार नाहीत. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते कि, मंत्र्यांचे सामाजिक स्थान व त्यांना लागणारी आर्थिक तरतूद ठरविताना त्यांची कार्यक्षमता, लोकशाही, राज्यकारभाराचे पावित्र्य आणि सचोटी याचा विचार केला पाहिजे.

गल्ली, कॉलनी, वार्ड व शहरातील विविध वसाहतीतील मंडळाच्या कार्यकारणीतील सदस्यांची जबाबदारी तसेच सामाजिक, धार्मिक, राजकीय व इतर क्षेत्रातील केंद्रीय, राज्य व जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक भूमिका तपासली पाहिजे. कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेचा पदाधिकारी हा बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे. विविध संघटनात नेते व कार्यकर्ते यांची द्वितीय फळी उपलब्ध व्हावी असे वाटत असेल तर संबंधितांना प्रशिक्षित केले पाहिजे. म्हणून बाबासाहेब तेव्हाच १९५६ च्या काळात म्हणाले होते की ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स चालविले पाहिजे. जेणेकरून त्यांना संबंधित सभागृहात आपली बाजू नीट मांडता येईल. याची सुरुवात त्यांनी आगस्ट १९५६ ला केली होती, जे मार्च १९५७ पर्यंत चालले. परंतु पुढील काळात कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेने तसा प्रयत्न न केल्याने समाजाची वाताहात होत आहे. करिता फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल सारख्या कार्यशाळा संपूर्ण देशभर चालविल्या पाहिजेत. ज्याचे परिणाम भविष्यकाळात पाहायला मिळतील. म्हणून आपण आज सदरील विषयावर चर्चा करीत आहोत.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गायकवाड म्हणाले की, राजकारण दिशाहीन झाले आहे. करिता समाजाला दिशा देणारे नेते व कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. वर्तमान नेतृत्वाने नेतृत्वाची द्वितीय फळी निर्माण होऊ दिली नाही. एका काळातील पँथर आज मांजरात स्थलांतरित झाले आहेत. अशिक्षित पुढे आल्याने, सुशिक्षित मागे पडलेत. गाढवावर वाघासारखे कातडे वापरले तरी ते वाघ होत नसतात.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, आजचे मंत्रिमंडळ कुठल्या विचारावर आधारलेले आहे? ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभा इत्यादी सभागृहात सक्षम प्रतिनिधी पाठवले गेले तरच समाजाचा विकास होईल. केवळ सफेद वस्त्र घातल्याने कुणी पुढारी होत नसतो? आपल्या वर्तमान नेतृत्वाने द्वितीय फळी का निर्माण होऊ दिली नाही? याचा पण विचार केला पाहिजे.

याप्रसंगी इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुठलेही विधान समजून घेताना त्याचे संदर्भ तपासले पाहिजेत. मंत्र्यांची कार्यक्षमता, सचोटी आणि पावित्र्य विचारात घेऊन आर्थिक तरतूद केली पाहिजे. असं बाबासाहेब आंबेडकरांनी सभागृहाला पटवून दिले होते. ज्याची प्रचिती गोलमेज परिषदेत आणि पुणे करारत सुद्धा पाहायला मिळते. साडी, माडी आणि गाडीत न राहता शिक्षितांनी आपली भूमिका समाजासाठी पार पाडली पाहिजे. ९६.५ टक्के लढवय्ये क्षत्रिय बहूजनांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला वाहून घेतले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन महादेव डांबरे तर प्रास्ताविक विलास कटारे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, महादेव डांबरे, विलास कटारे, उद्योजक शशिकांत काळे, उद्योजक मिलिंद बागुल, साधू आनंद, इंजिनिअर किशोर पाटील, प्रकाश गायकवाड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

कारमधून ऐटीत उतरल्या मॅडम, मुख्याध्यापक म्हणाले इंग्रजी शिकवतात मॅडम तर... विद्यार्थी म्हणाले इंग्रजी शिकवतात सर

नागनळी येथील आश्रम शाळेतही अनेक कारनामे चालू जनतेची सखोल चौकशी मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/महेश गायकवाड : महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जमाती कल्याण समितीने केलेल्या आश्रम शाळांच्या तपासणी नुसार जिल्ह्यातील ९७ आश्रम शाळांच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या सर्व आश्रम शाळांची सर्वच पातळीवर पुन्हा एकदा तपासणी होणार आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने नियोजन सुरू केले आहे. असा बोगस कारभार करणाऱ्या आश्रम शाळा चालकांचे धाबे दणाणले आहे.

यातच एक मजेशीर किस्सा ही यावेळी घडला आहे. आश्रम शाळांमध्ये तपासणी सुरू होती अगदी नेमके याच वेळी कारमधून ऐटीत उतरल्या मॅडम आणि शाळेत आल्या. प्रत्यक्ष तपासणी सुरू झाल्यावर मात्र विद्यार्थी म्हणाले या मॅडमना आम्ही ओळखत नाही, इंग्रजी आम्हाला सर शिकवतात ही परिस्थिती आहे जिल्ह्यातील आश्रम शाळांची. महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली आलेल्या समितीने केलेल्या आश्रम शाळा तपासणी असे सत्य समोर आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने या समितीच्या तपासणीचा अहवाल तयार करण्याचे काम सुरू केले आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जमाती कल्याण समितीच्या पथकाने जिल्ह्यातील आश्रम शाळांची तपासणी केली. मंगळवेढा तालुक्यातील बालाजीनगर येथे असलेल्या आश्रम शाळेला या पथकाने अचानक भेट दिली तेव्हा या पथकाच्या समोरच एक कार वेगाने आली व त्यातून मॅडम उतरल्या. समितीचे सदस्य शाळेकडे जात असतानाच या मॅडम घाई घाईने शाळेत पोहचल्या. सदस्यांनी शाळेत प्रवेश करून मुख्याध्यापकांच्या केबिनमध्ये ठिय्या मारला. मुख्याध्यापकाकडून शिक्षकांची माहिती घेतली. त्यावेळी त्या मुख्याध्यापकाने शिक्षक व विद्यार्थी संख्येची माहिती दिली. प्रत्यक्ष तपासणी करीत असताना कारमधून आलेल्या त्या मॅडम खूपच भांबावलेल्या दिसल्या. त्या मॅडम कोणता विषय शिकवतात असे विचारल्यावर मुख्याध्यापकाने इंग्रजी विषय असे सांगितले. ही गडबड समितीच्या सदस्यांना लक्षात आली होती. सदस्यांनी मुख्याध्यापकांना वारंवार कोणते विषय कोणते शिक्षक शिकवतात अशी विचारण केली. मुख्याध्यापकाची मोठीच पंचायत झाली होते तरीही त्यांनी ठामपणे शिक्षकांचे विषय सांगितले. पथकाने मात्र त्या मुख्याध्यापकाचीच परीक्षा घेण्याचे ठरवले. त्यांनी त्या मॅडमला इंग्रजी विषय कोणत्या इयत्तेवर शिकवता असे विचारल्यावर त्यांच्याकडून जे उत्तर आले त्या इयत्तेतील विद्यार्थ्यांना तेथे बोलवण्यात आले. विद्यार्थ्यांना इंग्रजीचे शिक्षक कोण विचारल्यावर जे उत्तर आले त्यातून या शाळेची पोलखोल झाली. विद्यार्थी म्हणाले इंग्रजी विषय आम्हाला सर शिकवतात, मुख्याध्यापकांनी तर मॅडमचे नाव सांगितले होते. मॅडम नवीनच नियुक्त झाल्या आहेत, अशी सावरा सावर करण्याचा त्या मुख्याध्यापकाने प्रयत्न केला. तपासणी शाळेत अनेक गडबडी दिसल्या. समितीने या गडबडीची नोंद घेतली व या शाळेची चौकशी लावली आहे.

समितीचे अध्यक्ष सुहास कांदे यांनी जिल्ह्यात असलेल्या ९७ आश्रम शाळेत गडबडी असल्याचे स्पष्ट केले आहे. या शाळांमध्ये १५१३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काम करत आहेत वेतनावर १५ कोटी १३ लाख खर्च होत आहेत या शाळेमधून २२,९९० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे दिसून येत आहे यातील निवासी विद्यार्थ्यांची संख्या १०,५३७ इतकी आहे विद्यार्थ्यांना दरमहा दोन कोटी इतके अनुदान वितरित केले जाते. या समितीने तीन दिवस जिल्ह्यात दौरा करून यातील अनेक शाळांची तपासणी केली. पण या शाळांचा कारभार मनमानी पद्धतीने सुरू असल्याचे कांदे आणि स्पष्ट केले आहे. अनेक आश्रम शाळा मुख्याध्यापकांच्या संस्था आहेत तर या शाळेत मुख्याध्यापकांची पत्नी शिक्षिका आहे व नातेवाईक नियुक्त करण्यात आले आहेत. यातील बरेच जण शाळेवर येतच नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे मोठे दुर्लक्ष असल्याचे चित्र या आश्रम शाळातील आहे. समितीने चौकशी केल्यानंतर आता प्रत्येक आश्रम शाळांची चौकशी करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अहवाल तयार करण्यात येत आहे. त्यामुळे बोगस आश्रम शाळेचा कारभार करणाऱ्यांची आता झोप उडाली आहे

नागनळी येथील आश्रम शाळेचीही सखोल चौकशी व्हावी

अक्कलकोट पासून जवळच असलेल्या नागनळी येथील आश्रम शाळेत मोठा भ्रष्टाचार असून मोठा अनागोंदी कारभार आहे आश्रम शाळेत जेवायचे नातेवाईक हेच नौकरी करत आहेत आश्रम शाळेची विविध पदाची भरती आतून मोठ्या प्रमाणात देणगी घेऊन गुपचूप करण्यात आलेली काँग्रेस सरकारच्या काळात गैरमार्गाने या आश्रम शाळेची मान्यता मिळविण्यात आली आहे आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना कोणत्याच सोयी सुविधा उपलब्ध नाहीत सकाळचे जेवण संध्याकाळी दिले जात असल्याचे कळते. विद्यार्थ्यांना नीट अंथरूण पांघरून ही दिले गेलेले नसल्याचेही कळते.

तेजस्वी अर्थमुव्हर्सच्या वतीने विद्यार्थी स्नेहभोजन सोहळा संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : तेजस्वी अर्थमूव्हर्सच्या वतीने श्रावण मास वर्षावासानिमित्त निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा हन्नुर येथे विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व साने गुरुजी यांच्या प्रतिमा पूजन अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, ग्रामपंचायत सदस्य, तेजस्वी अर्थमूव्हर्सचे प्रमुख गौतम बाळशंकर, यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले, यावेळी बाळशंकर परिवार व तेजस्वी ग्रुपच्या, उपक्रमाचे कौतुक, मुख्याध्यापक श्रीकांत राठोड सर, यावेळी विजय गायगवळी सर यांनी,उपक्रमाचे अभिनंदन केले. यावेळी बालाजी पवार सर, फिरदोस सय्यद, मुलाणी सर, ओमन मॅडम, सविता बाळशंकर आदी उपस्थित होते.

लक्ष्मी टाकळी येथे ओढ्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी येथील प्रतिभाताई परिचारक नगर मधील नागरिकांची ओढ्या अभावी गैरसही होत होती परंतु आता ही गैरसोय दूर होऊन त्यांना वाहतुकीचा चोळीत मार्ग लक्ष्मी टाकळी चे सरपंच श्री संजय साठे यांच्या प्रयत्नातून उपलब्ध होणार आहे.

प्रतिभाताई परिचारक नगर मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर कित्येक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर अखेर ओढ्याच्या कामाला सुरुवात झाली आहे सांडपाणी व्यवस्थाना पासून मिळालेले ६५लाख रुपये भरघोस निधी श्री एकनाथ शिंदे व महेश नाना साठे यांच्या यांच्या पाठिंबामुळे शक्य झाला आहे. शासनाच्या अडचणीवर मात करून कमिटी नेमली सर्वेक्षण केले व आज या कामाची सुरुवात घडवून आणल्याची माहिती लक्ष्मी टाकळी चे सरपंच संजय साठे यांनी सांगितले.

ओढा झाकणे व ९०% सांडपाणी दुर्गंधी मुक्त करणे या कामात महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे मोठे योगदान लाभले इतिहासात प्रथमच लक्ष्मी टाकळीला आषाढी वारी तीर्थक्षेत्रात समाविष्ट करून ३०० टॉयलेट व ६०० बाथरूम आणि ३० वॉटर टँकर मिळाले होते.

यावेळी मा.जि. प. सदस्य रामदास ढोणे सरपंच संजय तात्या साठे उपसरपंच रुपाली कारंडे, ग्रामपंचायत सरपंच औदुंबर ढोणे ग्रामपंचायत सदस्य सागर सोनवणे ग्रामपंचायत सदस्य नागरबाई साठे, सदस्य आशाबाई देवकते सदस्य रेश्मा साठे, सदस्य माजी सरपंच विजय मला वाळके, ग्रामसेवक जयंत खंडागळे, प्रशांत बापू डोंगरे पैगंबर शेख रोंगे सर प्राध्यापक आनंद गिरवीकर कुलकर्णी अण्णासाहेब खरात अँड चंद्रशेखर पोरे रमेश जाधव सर, मनोज लांबोरे अथर्व लांबोरे प्रवीण देशपांडे दीपक देशपांडे काका भानुदास शिंदे सर, अकबरातार उशीर तांबोळी समाधान नवगिरे दत्ता शेटे सर, श्याम देशपांडे देवल काका राजू पेंटर राठोड काका पांडुरंग जानकर ज्ञानेश्वर चोरमुले लखन आदमाने ओंकार कापसे गुरुजी रमेश मोरे अशोक लखन भोंडवावी शिवाजी खडतरे अमीर तांबोळी हरिश्चंद्र कवडे काका उपस्थित होते यावेळी महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती त्यामध्ये जानकर काकू, लिमये मॅडम, प्रियांका कवडे सौदागर मॅडम देवल काकू चुंबळकर काकू कुलकर्णी काकू तब्बू शेख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

मविप्रचे विद्यार्थी कर्मवीरांच्या विचारांचे व कार्याचे वारसदार : तहसीलदार नाईकवाडे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : मविप्र समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित समाजदिन या कार्यक्रम प्रसंगी गुणवंत विद्यार्थी, खेळाडू, प्राध्यापक यांचा गुणगौरव व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .. मविप्र ध्वजाचे ध्वजारोहण व समाज गित गायनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली असून छत्रपती शिवाजी महाराज आणि सर्व कर्मवीरांच्या प्रतिमेची पूजन यावेळी उपस्थितांच्या वतीने करण्यात आले, दि.१९ ऑगस्ट कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिन व समाज दिन कार्यक्रमा प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमराव डेर्ले, तहसीलदार विशाल नाईकवाडे,व्याख्यातील प्रा.डॉ. रमेश दरेकर प्रा. डॉ. ज्ञानोबा ढगे मराठा सेवा संघाचे नितीन कापसे व दीपक भदाणे महाविद्यालय विकास समिती आणि शालेय समितीचे सदस्य उपस्थित होते या प्रसंगी तहसीलदार नाईकवाडे म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी व बहुजन विद्यार्थी पदवीधर व उच्चशिक्षित व्हावा असे स्वप्न कर्मवीरांनी पाहिले.या वेळी तहसीलदार नाईकवाडे यांनी स्वतः चे अनुभव सांगितले ते म्हणाले की मी सहा वेळा स्पर्धा परीक्षेत अयशस्वी होऊनही फक्त संयम व सातत्याच्या जोरावर आज मी स्वतः तहसीलदार पदावर कार्यरत असल्याचे प्रेरणादायी उदाहरण त्यांनी उपस्थितांना दिले. कर्मवीरांच्या कार्यकृतीचे व विचारांचे सोने लुटण्याचा दिवस म्हणजे समाजदिन होय. म्हणूनच मविप्रचे विद्यार्थी कर्मवीरांच्या विचारांचे आणि कार्यांचे वारसदार व्हावेत असे तहसीलदार नाईकवाडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

दि.१९ ऑगस्ट कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिन, समाजदिन कार्यक्रम प्रसंगी तहसीलदार नाईकवाडे बोलत होते.

व्याख्याते प्राचार्य डॉ. रमेश दरेकर यांनी विशेषत्वाने कर्मवीर रावसाहेब थोरात यांचे कार्यकर्तृत्व आणि व्यक्तित्व विद्यार्थ्यांसमोर सचित्र उभे करताना सांगितले की, कर्मवीरांचे एकच ध्येय होते. बहुजनांची मुलं शिकली पाहिजे, त्यासाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून त्याग व समर्पित वृत्तीने काम करत प्रसंगी घरातील स्त्रियांचे स्त्रीधन मोडून, वैयक्तिक पदरमोड करत, मराठा विद्या प्रसारक समज संस्थेचे शैक्षणिक कार्य अविरतपने पुढे घेऊन जाण्याचे कार्य सर्व आद्य कर्मवीरांनी केले. बहुजनांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षण मिळण्याचा ध्यास ऊरी बाळगूनच मविप्र संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. म्हणूनच कर्मविरांचा त्याग आणि समर्पण हाच मविप्र संस्थेचा खरा कणा असल्याचे सांगत कर्मवीरांच्या त्यागातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी असे प्रतिपादन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. उत्तमराव डेर्ले म्हणाले की, मविप्र शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून सर्वच स्तरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध झाल्यामुळे बहुजन समाजाची सर्वांगीण उन्नती होण्याबरोबरच अज्ञान,अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्या विषयी जनजागृती होऊन समाजातील चुकीच्या गोष्टींना पायबंद बसला ,कर्मवीरांच्या विचाराचे सिंचन नव्या पिढीतील तरुणांच्या मनावर होणे ही काळाची गरज असल्याने समाजदिनासारखे स्तुत्य कार्यक्रम ह्या ठिकाणी महत्वाची भूमिका निश्चितच पार पाडतात असा विश्वास डॉ. डेर्ले यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.ज्ञानोबा ढगे म्हणाले. विद्यार्थी आणि समाज केंद्रबिंदू ठेवून कर्मवीरांच्या आदर्श कार्य व विचारसरणीवर मविप्र संस्था सातत्याने कार्य करीत विकासाच्या दिशेने गतिमान आहे.

मराठा सेवा संघ महानगरप्रमुख नितीन सुगंधी कापसे. म्हणाले, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच उद्योग व्यवसाय निर्माण करून स्वावलंबी व्हावे. मराठा सेवासंघ कक्षप्रमुख दिपक भदाणे यानी या वेळी आपले मनोगत व्यक्त केले. निफाड महाविद्यालयाचा उत्कृष्ट सुवर्ण पदक प्राप्त खेळाडू भूषण शिंदे याला मराठा सेवा संघाकडून महिना दहा हजार रुपये स्कॉलरशिप, राहण्याची व शैक्षणिक साहित्याची उपलब्धता करून देण्यात आले.

या प्रसंगी मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या मातोश्री कै. इंदुबाई (ताई) रामनाथ क्षीरसागर यांना सर्व उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी डॉ. उत्तमराव डेर्ले, डॉ. सीमाताई डेर्ले, श्रीमती ब्राह्मणकर, सुधाकर कापसे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या ठेव रकमेतून बक्षिसे प्रदान केली, तसेच महाविद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक यांचाही मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

महाविद्यालयीन सर्व प्राध्यापकांनी लिहिलेल्या शोधनिबंधाचे नॅशनल रिसर्च जर्नल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. सीमाताई डेर्ले, माधवराव गीते, जानकीराम धारराव, अशोक कुंदे, एड. रामेश्वर कोल्हे, एड. प्रवीण ठाकरे, यशवंत वडघुले, सुधाकर कापसे, रामनाथ धारराव, शाम शिंदे, सुरज कुंदे, भागीरथ शिंदे, वसंत पानगव्हाणे, दिग्विजय देशमुख, विलास दौंड, सयाजी शिंदे, त्र्यंबक शिंदे व सर्व मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्रा. अभय वडघुले यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रवीण ढेपले यांनी तर बक्षीस यादी प्रा. प्रवीण शार्दुल यांनी वाचली. कार्यक्रम यशस्वीततेसाठी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्राध्यापिका व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयात रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपणाचे आयोजन

९० रक्त बॉटलांचे संकलन

रक्तदानाचे पुण्य कार्य नव्या पिढीने हाती घेतले आहे : हर्षवर्धन पाटील

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री व संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयाच्या क्रीडा भवन या ठिकाणी इंदापूर महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे व वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना ते म्हणाले की रक्तदान सर्वश्रेष्ठ असून असे पुण्य कार्य नव्या पिढीने हाती घेतले आहे.

यावेळी अनेक मान्यवर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य ,प्रशालेचे मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांनी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार करीत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

इंदापूर महाविद्यालयाच्या गीताचे अनावरण माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' नव्या पिढीला स्वच्छ हवा मिळवून देणे त्यांना पर्यावरणीय लाभ मिळवून देणे यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे तसेच युवकांनी यावेळी रक्तदान सारखे पुण्य कार्य हाती घेतल्याचा आनंद होत आहे.

अक्षय रक्तपिढीचे धीरज पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदानाचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला.

यावेळी संस्थेचे संचालक विलासराव वाघमोडे, माजी उपनगराध्यक्ष प्रा. कृष्णा ताटे, माजी उपनगराध्यक्ष धनंजय पाटील, माजी नगरसेवक शेखर पाटील, माजी नगरसेवक कैलास कदम ,मेघश्याम पाटील , मच्छिंद्र शेटे ,अविनाश कोथमीरे , मनोज मोरे ,अमोलराजे इंगळे, सागर गानबोटे, दादा पिसे, पै.दत्ता पांढरे , महादेव पांढरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे , उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे , डॉ. संदेश शहा , डॉ. शिवाजी वीर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन भोसले यांनी केले.